सकाळ

# शिरोलीत सायबर जनजागृती अभियान

**ओझर, ता. १ :** शिरोली बुद्रुकच्या (ता. जुन्नर) न्यू इंग्लिश स्कूलमध्ये 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या अभियानांतर्गत इयत्ता पाचवी ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना 'सायबर क्राइम व मोबाईलचा सुरक्षित वापर' याविषयी माहिती देण्यात आली. ज्ञानेश्वर ग्रामोन्नती मंडळाचे बाळासाहेब जाधव कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय व क्विक हिल फाउंडेशनच्या वतीने हे सायबर जनजागृती अभियान राबविण्यात आले.



**शिरोली बुद्रुक (ता. जुन्नर) :** न्यू इंग्लिश स्कूलमध्ये सायबर जनजागृती अभियानात सहभागी विद्यार्थी व शिक्षक.

मोबाईलवर खोटे संदेश पाठवून नागरिकांची अनेकदा फसवणूक केली जाते. बँक खात्यातून परस्पर रकमा लंपास केल्या करून आर्थिक फसवणूक केली जाते. मोबईलद्वारे वैयक्तिक माहिती मिळवून त्याचा गैरवापर केला जातो. ऑनलाइन गेमींगद्वारे फसवणुकीचे अनेक प्रकार घडतात. काही वेळा फेसबुक, इंस्टाग्राम, व्हॉटसॲप या समाज माध्यमांवरील फोटोंचा गैरवापर करून अश्लील फोटो, व्हिडिओ बनविले जातात. त्याचा वापर करून ब्लॅकमेलिंगच्या घटना घडतात. खोट्या ओळखीचा वापर करून मुला-मुलींची बदनामी केली जाते व त्यांना वेठीस धरून पैशाची मागणी केली जाते. या सर्व बाबींपासून स्वतःचे व कुटुंबाचे रक्षण करण्यासाठी शालेय विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. प्रशिक्षित महाविद्यालयीन विद्यार्थी मयूर नवले, आदित्य बडे, दिक्षा सस्ते, अक्षदा कोकाटे, गौरव पाटेकर, ओम वाव्हळ यांनी विद्यार्थ्यांना विविध उदाहरणांच्या माध्यमातून सायबर गुन्ह्यांविषयी मार्गदर्शन केले. विद्यालयातील वनराई अंतर्गत इकोक्लब, राष्ट्रीय हरितसेना, स्काऊट गाइड व आरएसपी विभागामार्फत या कार्यक्रमाचे आयोजन केल्याची माहिती विद्यालयाच्या पर्यवेक्षिका अनघा घोडके यांनी दिली.

Pune, District-Today
02/08/2025 Page No. 7